**स्थायी निदेश क्र.०१ ते ०८**

क्र. डिएमई १०२००१/प्र.क्र.१/२००१/१
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
गृहनिर्माण भवन, तळ मजला,
कलानगर वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक ०१/०१/२००१.

प्रति,
अध्यक्ष/मुख्याधिकारी
(सर्व)
__________ नगरपरिषद
__________ जिल्हा

**विषय : नगरपरिषद कामकाजात आढळून आलेल्या उणीवा सुधारण्याबाबत निदेश.**

**संदर्भ : या संचालनालयाचे वतीने निर्गमित केलेली खालील विशेष परिपत्रके क्रमांक १ ते ८**

१) क्र.नपप्रसं/२०००/प्र.क्र.५/२०००/५,दिनांक १४ ऑगस्ट २०००
विषय : नगरपरिषदांची वार्षिक तपासणी सुधारित तपासणी नमुने.

२) क्र.आयएनएस १०२०/प्र.क्र.४०/९९/६, दिनांक १४ ऑगस्ट २०००
विषय : तपासणी टिपणीच्या अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणे.

३) क्र.संकीर्ण २०००/प्र.क्र.२४/२०००/८,दिनांक १४ ऑगस्ट २०००
विषय : नगरपरिषद सभेसाठी माहितीचे संकलन सुधारीत प्रपत्रे.

४) क्र.सीओडी १२०/प्र.क्र.१३५/२०००/२,दिनांक ३१ ऑगस्ट २०००
विषय : न्यायालयीन प्रकरणे गांभीर्याने व प्राधान्याने हाताळणे.

५) क्र.नपसु ००/प्र.क्र.२४/२०००/१,दिनांक १३ ऑक्टोबर २०००
विषय : नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता महत्वाच्या उपाययोजना.

६) क्र.संकीर्ण १०-२०००/प्र.क्र.८८/००/८,दिनांक १९ ऑक्टोबर २०००
विषय : नगरपरिषद खर्चात काटकसर व नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी यांची सेवा पुनर्विलोकन करणे.

७) क्र.संकीर्ण १०२०/प्र.क्र.१३२/००/८,दिनांक २८ ऑक्टोबर २०००
विषय : प्रशासकीय कामानुसार नगरपरिषदांची प्रतवारी ठरविणेबाबत.

८) क्र.नप्रस/पदनि/१०२०/प्र.क्र.१६४/२०००/७,दिनांक ०६ नोव्हेंबर २०००
विषय : नगरपरिषद आस्थापनेवर सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त राहणारी पदे व्यपगत होणेबाबत.

०१. मागील ६ महिन्याचे कालावधीत या संचालनालयाचे वतीने महाराष्ट्रातील विविध नगरपरिषदांच्या कामकाजाचा आढावा खालील माध्यमातून घेणेत आला -

१) नगरपरिषदांची प्रशासकीय तपासणी २) नगरपरिषद कामकाज आढावा बैठका
३) नगरपरिषदांचे लेखापरिक्षण अहवाल ४) राज्य वित्त आयोगाचे अहवाल ५) न्यायालयीन निकाल
६) निवेदन व तक्रार अर्ज ७) लोकायुक्त व उपलोकायुक्त कार्यालयाकडून प्राप्त अहवाल/शिफारशी.

०२. नगरपरिषदांच्या कामकाजाच्या या आढाव्यामध्ये प्रामुख्याने खालील उणीवा निदर्शनास आलेल्या आहेत.

१) नगरपरिषदेच्या कारभाराचे वार्षिक तपासणीचे माध्यमातून आर्थिकदृष्टया अचूक विश्लेषण व मिमांसा न होणे नगरपरिषदांच्या कारभारात आढळून आलेल्या अनियमिततांवर प्रभावी नियंत्रण आणण्यांत अपयश.

२) नगरपरिषदांचे तपासणी टिपणीचे वाचन वेळीच न होणे, त्यामुळे तपासणीत काढण्यांत आलेल्या मुद्यांचे गांभीर्य न राहता नगरपरिषदांकडून पुर्तता अहवाल सादर न होणे.

३) नगरपरिषदांचे कामकाजाचे विभागीय पातळीवरुन घेण्यांत येत असलेल्या सभांमध्ये उचित मुल्यमापन होवून नगरपरिषदांच्या कामकाजाचा अचूक आढावा घेता यावा व कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवता यावे याकरीता अशा सभासाठी ठराविक प्रपत्रे विहित करण्यांत आलेली नसणे.

४) न्यायालयात दाखल करण्यांत आलेल्या तक्रार अर्जावर प्रतिवादी नगरपरिषदा यांचेतर्फे लेखी अभिकथन विहित मुदतीत न्यायालयात सादर न होणे. त्याचप्रमाणे लेखी कथनाच्या पुष्ठर्थ तक्रारदाराच्या तक्रारीचे खंडन करण्यासाठी प्रतिवादी नगरपरिषद यांचेमार्फत कागदपत्र सादर करण्यांत न येणे त्यामुळे न्यायालयाचे निकाल नगरपरिषदेविरुध्द लागणे, मुदतीत अपील न करणे, न्यायालयीन कामकाजाबाबत मुख्याधिका-यांकडून आवश्यक दक्षता न घेतली जाणे.

५) नगरपरिषदा अंदाजपत्रक तयार करतांना जमा व खर्चाच्या रकमा वाढवून दाखविणे, प्रलंबित असलेल्या दायित्वात वाढ करणे, मालमत्ता कर व पाणीपट्टी यात गरज असताना सुधारणा न करणे, नगरपरिषदामध्ये विविध निधीचे योग्य विनियोग न होणे. वित्तीय शिस्तीचे पालन न करणे, नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरीता महत्वाच्या उपाययोजनांची गरज.

६) राज्यातील नगरपरिषदांचे आर्थिक स्थितीचा आढावा घेता मत्तेपेक्षा दायित्व वाढत चाललेले आहे. आर्थिक शिस्तीचे सातत्याने काटेकोर पालन न होणे, त्यामुळे नगरपरिषदांचे खर्चात काटकसर न होणे व नगरपरिषद अधिकारी/कर्मचारी वयाच्या ५०/५५ वर्षाच्या पलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर लोकहितास्तव सेवा पुनर्विलोकन न होणे.

७) नगरपरिषदांचे कामानुसार प्रतवारी न ठरविली जाणे, ज्या नगरपरिषदा प्रतवारीत मागे आहेत अशा नगरपरिषदांना अंतर्मुख होऊन आपल्या प्रशासकीय कामकाजात सुधारणा करण्याच्या दृष्टीने स्पर्धात्मक वातावरण नसणे.

८) नगरपरिषदांची आर्थिक स्थिती सुधारणेचा एक महत्वाचा उपाय म्हणजे आस्थापनेवरील खर्चावर मर्यादा न लावली जाणे, अनावश्यक रिक्त पदे न भरणे.

९) शासन/संचालनालयाचे वतीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांच्या/निदेशनाचा कटाक्षाने पालन न करणे.

१०) कर्मचा-यांच्या नेमणूका करताना तसेच साहित्य खरेदी करताना नियमबाहय कृतीचा अवलंब होणे तसेच व्यापक जनहिताचा विचार न करता टाळता येण्यासारखी कामे हाती घेतली जाणे व नगरपरिषद निधीचा गैरवापर होणे.

०३. यावरुन या संचालनालयास असे स्पष्ट झाले की, नगरपरिषदांकडून त्यांचेवर कायद्याने सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदा-या महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व त्याअन्वये अस्तित्वात असलेले नियम, उपविधी तसेच नगरपरिषदेच्या कामकाजाशी संबंधित अन्य अधिनियम यातील तरतुदीअन्वये पूर्ण जबाबदारीने पार पाडल्या जात नाहीत. त्यामध्ये वरील नमूद केल्याप्रमाणे अनेक उणीवा दिसून आल्या आहेत. त्यामुळे नगरपरिषदेच्या कामकाजात भरीव अशी सुधारणा घडवून आणणे जरुरीचे आहे. त्यानुषंगाने नगरपरिषदेमधील प्राधिका-यांना पुनश्च सजग करणे उपयोगी ठरेल असे या संचालनालयास वाटते.

०४. हे विचारात घेवून मागील चार महिन्यात विशेष परिपत्रके १ ते ८ निर्गमित करण्यांत आली आहेत व त्याद्वारे वेगवेगळया विषयांवर विशिष्ट अशा सूचना देण्यांत आल्या आहेत. या स्थायी निदेशाद्वारे सर्व नगरपरिषदांना कळविण्यांत येते की, त्यांनी वरील सर्व (१ ते ८) विशेष परिपत्रकातील सर्व सूचना महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३१२ खाली संचालकांकडून देण्यांत आलेले स्थायी निदेश समजावे.

०५. सर्व मुख्याधिकारी यांनी उक्त निदेशांचे संदर्भात अनुसरावयाची कार्यवाही अशी राहील.

१) संदर्भात नमूद केलेले आठ (स्थायी निदेश) तसेच यापुढे वेळोवेळी दिले जाणारे स्थायी निदेश हे स्थायी समितीपुढे तसेच नगरपरिषदेच्या आमसभेपुढे विषयपत्रिकेवर विषय घेऊन सादर करावेत.

२) क्रमांक १ येथे नमूद केल्याप्रमाणे वरील स्थायी निदेश (१ ते ८) तसेच भविष्यात देण्यात येणारे स्थायी निदेश स्थायी समिती नगरपरिषद आमसभेत सूपर्ण वाचन केल्याची नोंद सभेच्या कार्यवृत्तांतात करावी.

३) स्थायी निदेश क्र.१ ते ८ तसेच यापुढे दिले जाणारे स्थायी निदेशाची एकत्रित संचिका नगदपरिषदेच्या प्रत्येक विभागास स्वतंत्र रित्या उपलब्ध करुन देण्यांत यावी.

४) स्थायी निदेश क्र.१ ते ८ तसेच यापुढे दिले जाणारे स्थायी निदेश हे सर्व संबंधित लिपिक तसेच विभाग प्रमुख यांना ज्ञात राहण्याच्या दृष्टीने त्यांचा वेळोवेळी आढावा घेणे व त्याप्रमाणे उपाययोजना करणे.

५) या स्थायी निदेशानुसार नगरपरिषदेचे सर्व कामकाज प्रचलित अधिनियम, नियम, उपविधी यांचे चाकोरीतच पार पाडण्यांची दक्षता घेणे.

६) या स्थायी निदेशाचे पालन करण्याची जबाबदारी नगरपरिषदेचे सर्व पदाधिकारी/अधिकारी व कर्मचारी यांची राहील.

०६. वरील प्रमाणे कार्यवाहीसाठी नोंद घेतल्याबाबत मुख्याधिकारी यांनी अहवाल सादर करावा.

( भगवान सहाय )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय